सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना दिवाळीनिमित्त ४ शिधाजिन्नसांचा समावेश असलेल्या शिधाजिन्नस संचाचे वितरण करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अधापु-२०२२/प्र.क्र.५४/ना.पु.२२**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०२२.

वाचा :- १. शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक २४ जुलै, २०१५
२. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१४९/नापु-२२, दिनांक १२ सप्टेंबर, २०१७

प्रस्तावना :-

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना (Antyoday Anna Yojana-AAY) व प्राधान्य कुटुंब (Priority Households-PHH) शिधापत्रिकाधारकांना तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपिएल) केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना (APL- Farmer) सवलतीच्या दराने अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. दिनांक २७.०९.२०२२ रोजी मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना आगामी दिवाळी सणानिमित्त शासनाकडून सवलतीच्या दरात अतिरिक्त शिधाजिन्नस (दिवाळी पॅकेज) देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

संदर्भाधीन दिनांक १२.०९.२०१७ च्या शासन निर्णयामध्ये खुल्या बाजारात तूरडाळ, चणाडाळ, साखर इत्यादी चीज वस्तुंच्या दरामध्ये लक्षणीय वाढ झाल्यास NeML NCDEX Group of Company या Platform चा उपयोग करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रास्त दराने सदर चीज वस्तुंचे वाटप करण्याकरिता तरतूद आहे. सदर Online Platform वापराच्या तरतूदीनुसार दिवाळी सणानिमित्त नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त रवा, चणाडाळ, साखर व पामतेल हे शिधाजिन्नस उपलब्ध करुन देण्याकरिता NeML NCDEX Group of Company यांच्या मार्फत निविदा प्रक्रीया राबविण्यात आली.

दिनांक ०४.१०.२०२२ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत AAY, PHH व APL- Farmer शिधापत्रिकाधारकांना दिवाळी सणानिमित्त नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त प्रत्येकी १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर पामतेल या ४ शिधाजिन्नसांचा समावेश असलेला शिधाजिन्नस संच उपलब्ध करुन देण्यास मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपिएल) केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांना आगामी दिवाळीनिमित्त १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर पामतेल या ४ शिधाजिन्नसांचा समावेश असलेला १ शिधाजिन्नस संच प्रतिशिधापत्रिका ई-पॉस प्रणालीद्वारे वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दिनांक १२.०९.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वरील शिधाजिन्नस संच खरेदीकरिता NeML NCDEX Group of Company यांच्या मार्फत online portal द्वारे राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेस मान्यता देण्यात येत असून त्याद्वारे निवड करण्यात आलेल्या महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या न्यूनतम दराने उपरोक्त शिधाजिन्नस संच खरेदी करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर निविदाकाराने शिधाजिन्नस संच तालुका गोदामांपर्यंत पोहोचविणे आवश्यक राहील.

३. सदर शिधाजिन्नस संच पात्र शिधापत्रिकाधारकांना प्रतिशिधापत्रिका ₹१००/- प्रतिसंच या सवलतीच्या दराने वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. शिधाजिन्नस संचाच्या खरेदीसाठी ₹४७८.२४ कोटी व इतर अनुषांगिक खर्चासाठी ₹ ३५.०० कोटी अशा एकूण ₹ ५१३.२४ कोटी इतक्या खर्चास तसेच, सदर शिधाजिन्नस संच विक्रीतून शासनास जमा होणारी रक्कम वजा जाता उर्वरित रकमेच्या अतिरिक्त आर्थिक भारास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेची माहिती सर्व रास्तभाव दुकानदारांना/पात्र कुटुंबांना होण्यासाठी प्रसिद्धी करण्यास व त्याकरिता येणाऱ्या खर्चास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

५. उपरोक्त प्रयोजनासाठी येणाऱ्या खर्चास वित्त विभागाने निधी उपलब्ध करून द्यावा.

६. सदर खरेदीसाठी येणारा खर्च ४४०८, अन्न साठवण व वखार यावरील भांडवली खर्च ०१ अन्न, १०१ प्रापण व पुरवठा, ०२ प्रापण, वितरण व किंमत नियंत्रण, (०२) (०१) मुंबई शहर - खरेदीची किंमत (अनिवार्य), २१, पुरवठा व सामग्री (४४०८००७७) या लेखाशीर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पिय तरतुदीतून भागविण्यात यावा. तसेच अनुषंगिक खर्च लेखाशिर्ष ४४०८०२६४ यामधून भागविण्यात यावा. तर विक्रीतून जमा होणाऱ्या रकमा लेखाशिर्ष ४४०८०१६६ (मुंबई) व लेखाशिर्ष ४४०८०१७५ (मुफसल) यामध्ये जमा करण्यात येतील.

याचप्रमाणे एकूण होणाऱ्या खर्चामधून, जमा होणारी रक्कम वजा जाता, येणारी तूट (०३) (०७) अन्नधान्य व्यवहारातील तूटीच्या प्रतिपूर्ती अर्थसहाय्यासाठी अनिवार्य (२४०८०४११) ३३, अर्थसहाय्य लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २८३/व्यय १०, दिनांक ०३.१०.२०२२ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१००४१७२१५८०४०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NETRA PRASHANT MANKAME

Digitally signed by NETRA PRASHANT MANKAME
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=19e4a6ac471ded0614da7ea31c20099ea471d8436dcf49faa3c0b2e0638732c3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C3DA775EEDF3E67170F45DF66F5DEAC516C0B0AB689DA4176D3BEBB60CCAD385, cn=NETRA PRASHANT MANKAME
Date: 2022.10.04 18:47:26 +05'30'

**( ने. प्र. मानकामे )**
शासनाच्या उप सचिव

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१२. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१३. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
१४. सर्व उपायुक्त (पुरवठा)
१५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१६. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१७. सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१८. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१९.सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२०. सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

२२. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
२३. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
२४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-२, मुंबई
२६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, मुंबई
२७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागरी पुरवठा, लेखा परिक्षा मंडळ द्वारा - वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२९. वित्त विभाग, व्यय-४, मंत्रालय, मुंबई
३०. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
३१. सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३२. NeML NCDEX Group of Company, आकृती कॉर्पोरेट पार्क, पहिला मजला, एलबीएस मार्ग, कांजुर मार्ग (पश्चिम), मुंबई- ४०० ०६६.
३३. Maharashtra State Co-op Consumers Federation Ltd, ८७ A- राज चेंबर्स, पाचवा मजला, देवजी रतनजी मार्ग, चिंचबंदर (दानाबंदर), मुंबई - ४००००९.
३४. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).